**महाराष्ट्र शासन**
**क्र. सगृधो - २००१/ प्र.क्र.१८८/१४-स,**
**सहकार व वस्त्रोद्योग विभाग**
**मंत्रालय, मुंबई ३२**
**दिनांक ९ ऑगस्ट, २००१.**

**वाचा : सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्रमांक गृहनिर्माण / गाळा तबदील/फी/८९, दिनांक २७-११-१९७९ चे परिपत्रक.**

ज्या अर्थी, सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी तयार केलेल्या नमुनेदार उपविधीना सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक ०२-०७-२००१ रोजी मान्यता दिली असून हया नमुनेदार उपविधीमधील उपविधी क्र. ३८(ई) मध्ये नमूद केल्यानुसार, सहकारी गृहनिर्माण संस्थेमधील सदनिका / गाळा हस्तांतरित (तबदील) करताना आकारवयाच्या प्रिमीयमचे कमाल दर ठरविण्याचे अधिकार राज्य शासनाच्या सहकार व वस्त्रोद्योग विभागाला दिलेले आहेत, आणि

ज्या अर्थी , सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांच्या परिपत्रक क्र. गृहनिर्माण /गाळा तबदील फी/८९, दिनांक २७-११-१९७९ अन्वये प्रिमीयमचे दर निश्चित केलेले असून सद्यःस्थितीत प्रस्तुत परिपत्रक रद्द करुन राज्यशासनाने त्याबाबतचे आदेश प्रस्तुत करणे अगत्याचे झालेले असल्याने सहकारी गृहनिर्माण संस्थेमधील सदनिका / गाळा हस्तांतरित (तबदील) करताना आकारण्याच्या प्रिमीयम संबंधी योग्य ते आदेश काढण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, त्या अर्थी

**आ दे श**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, कलम ७९-अ अन्वये राज्य शासनास प्रदान ...त आलेल्या अधिकाराचा वापर करुन राज्यातील जनतेच्या व्यापक जनहितार्थ पुढीलप्रमाणे ...देश देण्यात येत आहेत.

१) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्र. ...निर्माण / गाळा तबदील /फी/८९, दिनांक २७-११-१९८९ रद्द करण्यात येत आहे.

२) सभासदाची सहकारी गृहनिर्माण संस्थेमधील सदनिका / गाळा आणि त्याचे संस्थेच्या भागभांडवल / मालमत्तमधील भाग व हक्क दुसऱ्याकडे हस्तांतरित (तबदिल) करताना आकारवयाच्या प्रिमीयमचा दर संस्थेच्या सर्वसाधारण सभेमध्ये निश्चित करावेत.

मात्र संस्थेच्या सर्वसाधारण सभेने ठरविलेले प्रिमीयमचे दर कोणत्याही परिस्थितीत खाली दर्शविण्यात आलेल्या कमाल दरापेक्षा जास्त असू नयेत.

| विभाग | | आकारावयचा प्रिमीयमचा दर ( रुपये) |
|---|---|---|
| १. | महानगर पालिका व प्राधिकारण क्षेत्र | २५,०००/- |
| २. | " अ" वर्ग नगर पालिका | २०,०००/- |
| ३. | " ब" वर्ग नगर पालिका | १५,०००/- |
| ४. | " क" वर्ग नगर पालिका | १०,०००/- |
| ५. | ग्रामपंचयती (ग्रामीण क्षेत्र) | ५,०००/- |

सदर आदेश तात्काळ अंमलात येतील.
महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशनुसार व नावाने,

**सही /-**
**( वसंत पोरेपळडीवर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**
**सहकार व वस्त्रोद्योग विभाग**

---------------*****---------------

जा.क्र. गृह/डी-३/हस्तातरण शुल्क/ परिपत्रक २००२
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे -१ यांचे कार्यालय,
दिनांक :- ३/७/ २००७.

प्रति,

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)
२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)
३. सहाय्यक निबंधक / तालुका उपनिबंधक सहकारी संस्था, (सर्व)

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था**
**महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे करिता.**